अतिरिक्त महापालिका आयुक्त कार्यालय (ज),
पुणे महानगरपालिका.
जावक क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/२८७६
दिनांक : २८/०७/२०२०

## आदेश

विषय -: आरोग्य विभागाकडील आरोग्य अधिकारी यांचेकडील कार्यभार व कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ -: १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग शासन आदेश क्र. प्रतिनि२०२०/प्र.क्र.१३३/ सेवा-२, दि. २३/०७/२०२०.
२. आदेश जा. क्र. अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/ २८७५ , दि.२८/०७/२०२०.
३. कार्यालयीन आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/६३६१, दि. ०५/१०/२०१८.

डॉ. नितीन बिलोलीकर यांना संदर्भ क्र. २ चे आदेशान्वये दिनांक २७/०७/२०२० रोजी मध्यान्हपूर्व 'आरोग्य अधिकारी' (आरोग्य सेवा, श्रेणी-१), पुणे महानगरपालिका या पदावर रुजू करून घेण्यात आले आहे.

डॉ. नितीन बिलोलीकर, आरोग्य अधिकारी यांनी डॉ. रामचंद्र हंकारे, आरोग्य अधिकारी यांचे समवेत आरोग्य विभागाकडील कामकाज करावयाचे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये आरोग्य विभागाच्या कामाची व्याप्ती मोठ्या स्वरुपात आहे. तसेच पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ कोरोना संसर्गाबाबत आपत्ती व्यवस्थापन कायदा लागू झाला आहे. त्या अनुषंगाने डॉ. नितीन बिलोलीकर व डॉ. रामचंद्र हंकारे, आरोग्य अधिकारी यांचेकडे पुढीलप्रमाणे कामकाज वाटप करणेत येत आहे. डॉ. रामचंद्र हंकारे हे संदर्भ क्र. ३ चे कार्यालयीन आदेशान्वये कामकाज पहात आहेत. तथापि, कोविड-१९ ची परिस्थिती पाहता त्यांनी खालीलप्रमाणे काम पहावे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | सोपविण्यात आलेले कामकाज |
|---|---|---|
| १. | डॉ. रामचंद्र हंकारे ,<br>आरोग्य अधिकारी | १. कार्यालयीन कामकाज<br>२. खाजगी रुग्णालयाकडील बेड व्यवस्था (DCH/DCHC)<br>३. आरोग्य विभागाकडील कर्मचारी व्यवस्थापन<br>४. आरोग्य विभागाकडील भांडार व्यवस्थापन<br>५. CCC व्यवस्थापन<br>६. वरील कामांच्या निगडीत अनुषंगिक कामे |
| २. | डॉ. नितीन बिलोलीकर ,<br>आरोग्य अधिकारी | १. रुग्णांचे नमुने व प्रयोगशाळा अहवाल व्यवस्थापन<br>२. रुग्ण शोधणे (ट्रेसिंग) व सर्वेक्षण<br>३. संकेतस्थळावरील माहिती व आकडेवारी अद्यावत करणे<br>४. वॉर रूम व गृह विलगीकरण कक्ष व्यवस्थापन<br>५. PMC चे रुग्णालय कोविड-१९ करिता वापर करणे (DCHC)<br>६. वरील कामांच्या निगडीत अनुषंगिक कामे |

वर नमूद विभागणीप्रमाणे संबंधित सहाय्यक आरोग्य अधिकारी यांनी विषयाप्रमाणे वरिष्ठांना नस्ती सादर करावी.

तरी सदर आदेशाच्या दिनांकापासून ,उपरोक्त आरोग्य अधिकारी यांनी सोपविण्यात आलेले कामकाज मा (ज) अतिरिक्त महापालिका आयुक्त .यांच्या नियंत्रणाखाली करावयाचे आहे .

२८/७/२०२०

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत –:

१) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि)
२) आरोग्य अधिकारी
३) सहाय्यक आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

यांजकडेस पुढील तजविजीसाठी रवाना ...